# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक २४(२)] शुक्रवार, सप्टेंबर १७, २०१०/भाद्र २६, शके १९३२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ३८


## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.—** बोनस प्रदान अधिनियम, १९६५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश . . . . . . . . | १-३ |


## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ सप्टेंबर २०१०.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2010.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE PAYMENT OF BONUS ACT, 1965,
IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

## सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.

**बोनस प्रदान अधिनियम, १९६५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी,
१९६५ चा २१. बोनस प्रदान अधिनियम, १९६५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) च्या परंतुकाअन्वये, भारताच्या राष्ट्रपतींचे अनुदेश मिळविण्यात आले आहेत ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, बोनस प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, २०१० असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन १९६५ चा अधिनियम क्रमांक २१ यामध्ये कलम ११क समाविष्ट करणे.

**२.** बोनस प्रदान अधिनियम, १९६५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), त्याच्या कलम ११ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६५ चा २१.

बोनस प्रदान करण्याची पद्धत.

" **११क.** या अधिनियमाअन्वये बोनस म्हणून एखाद्या कामगाराला देय असणाऱ्या सर्व रकमा, कामगाराच्या नावे त्याच्या खात्यात रक्कम देय असलेला धनादेश काढून त्याद्वारे किंवा कामगाराच्या बँक खात्यामध्ये त्या जमा करून, देण्यात येतील. ".

सन १९६५ चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम १९ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ मधील " रोखीने " हा मजकूर वगळण्यात येईल.

## निवेदन.

बोनस प्रदान अधिनियम, १९६५ (१९६५ चा २१) यामध्ये नफ्याच्या आधारे किंवा उत्पादन किंवा उत्पादकतेच्या आधारे विवक्षित आस्थापनांमध्ये नोकरी करणाऱ्या व्यक्तींना बोनस प्रदान करण्यासाठी आणि तत्संबंधित बाबींसाठी तरतूद आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १९ मध्ये, या अधिनियमान्वये बोनसच्या रुपाने कामगारांना देय असलेल्या सर्व रकमा या, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत त्याच्या नियोक्त्याकडून रोखीने देण्यात येतील अशी तरतूद आहे.

२. अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेच्या पुष्कळदा असे निदर्शनास आले आहे की, उक्त अधिनियमाअन्वये देय असलेली रक्कम काही नियोक्ते कामगारांना देत नाहीत किंवा अंशतः देऊन कामगारांची पिळवणूक करतात. तसेच असेही निदर्शनास आले आहे की, वैधानिक दायित्वे टाळता यावीत व कामगारांना त्यांच्या वैधानिक लाभांपासून वंचित ठेवता यावे यासाठी असे नियोक्ते कायद्यान्वये आवश्यक असलेले वैधानिक अभिलेख ठेवत नाहीत.

३. अशा अनुचित कामगार प्रथांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने कामगारांना देण्यात येणारी रक्कम कामगारांच्या नावावर त्यांच्या खात्यात रक्कम देय असलेला धनादेश काढून त्याद्वारे किंवा अशा कामगारांच्या बँक खात्यात ती रक्कम जमा करून त्याद्वारे देण्याची तरतूद करण्याकरिता बोनस प्रदान अधिनियम, १९६५ यात, तो महाराष्ट्र राज्यास लागू असताना, आणखी सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी बोनस प्रदान अधिनियम, १९६५ यात, तो महाराष्ट्र राज्यास लागू असताना, आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई, **के. शंकरनारायणन्,**

दिनांक १६ सप्टेंबर २०१०. महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कविता गुप्ता,**

शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ३३(२) ] शुक्रवार, सप्टेंबर १७, २०१०/भाद्र २६, शके १९३२ [ पृष्ठे ३, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक ६६


## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Payment of Bonus (Maharashtra Amendment) Ordinance, 2010 (Mah. Ord. XII of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Payment of Bonus (Maharashtra Amendment) Ordinance, 2010 (Mah. Ord. XII of 2010), published under the authority of the Governor.)

---

**INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 17th September 2010.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2010.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Payment of Bonus Act, 1965, in its application to the State of Maharashtra.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Payment of Bonus Act, 1965, in its application to the State of Maharashtra, for the purposes hereinafter appearing ;

21 of 1965.

AND WHEREAS the instructions of the President of India under the proviso to clause (*1*) of article 213 of the Constitution of India have been obtained ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Payment of Bonus (Maharashtra Amendment) Ordinance, 2010.

(*2*) It shall come into force at once.

Insertion of section 11A in Act 21 of 1965.

**2.** After section 11 of the Payment of Bonus Act, 1965, in its application to the State of Maharashtra (hereinafter referred to as "the principal Act"), the following section shall be inserted, namely :— 21 of 1965.

Mode of payment of bonus.

" **11A.** All amounts payable to an employee by way of bonus under this Act shall be paid either by an account payee cheque drawn in favour of the employee or by crediting the same in the bank account of an employee.".

Amendment of section 19 of Act 21 of 1965.

**3.** In section 19 of the principal Act, the words "in cash" shall be deleted.

## STATEMENT

The Payment of Bonus Act, 1965 (21 of 1965) provides for payment of bonus, to persons employed in certain establishments on the basis of profits or on the basis of production or productivity and for matters connected therewith. Section 19 of the said Act provides that all amounts payable to an employee by way of bonus under this Act shall be paid in cash by his employer within the time limit specified therein.

2. The enforcement machinery have often noticed that the employees are exploited by some employers either by not paying or partly paying the amounts payable under the said Act. It has also been brought to the notice that those employers do not maintain the statutory records required under the law so as to do away with the statutory liabilities and to deprive the employees of their statutory benefits.

3. With a view to curb such unfair labour practices, it is considered expedient to amend the Payment of Bonus Act, 1965, in its application in the State of Maharashtra, so as to provide that amounts payable to the employees are paid either by way of an account payee cheque drawn in favour of the employees or by crediting the same in the bank account of such employees.

4. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Payment of Bonus Act, 1965, in its application to the State of Maharashtra, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 16th September 2010.

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KAVITA GUPTA,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI